क्र. कार्यासन ४/आयकर/२६२ यु/प्रकरण १५५
नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे
यांचे कार्यालय, पुणे -१. दि. .११.१९८६

**विषय :– आयकर अधिनियम कलम २६९ यु.एल (१) अन्वये ‘‘ ना हरकत प्रमाणपत्र’’**

**प रि प त्र क** :-

आयकर अधिनियम १९६१ मध्ये नवीन कलम २६९ यू समाविष्ट करण्यात आले असून, त्यातील कलम २६९ यु.एल. (१) अन्वये व भारत सरकारच्या सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेसचे परिपत्रक क्र. एक नं. ५१६ /१८/८६ डब्ल्यूटी दिनांक ४.८.१९८६ अन्वये केंद्रशासित दिल्ली, बृहन्मुंबई, मेट्रो पॉलिटिन, कलकत्ता व मेंट्रो पॉलिटिन मद्रास येथील स्थावर मिळकती कोणत्याही प्रकारचे हस्तांतरणाची किंमत रु. १० लाखापेक्षा जास्त असेल तर अशा हस्तांतरणाची नोंदणी कोणत्याही नोंदणी अधिकाऱ्याचे आयकर खात्याला योग्य त्या अधिकाऱ्याचे ना हरकत प्रमाणपत्र दाखल केल्या शिवाय करु नये.

वरील भागातील दस्तऐवज बहुधा दुय्यम निबंधक मुंबई / बांद्रा यांच्या कार्यालयात नोंदले जातात म्हणून त्यांनी वरील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे. इतर दुय्यम निबंधकाकडे एखादया दस्तऐवजात त्यांच्या पोट तुकडीतील मिळकतीशिवाय वरील भागातील मिळकत असण्याची शक्यता आहे. अशा वेळी भागातील मिळकतीची किंमत जर रु. १० लाखा पेक्षा जास्त असेल तर त्या दुय्यम निबंधकांनी सुध्दा वरील तरतूदीचे पालन करावे.

वरील कलम २६९ य.एल. (१) आयकर अधिनियमाच्या प्रकरण XII मध्ये समाविष्ट आहे व हे प्रकरण दिनांक १.१०.१९८६ पासून अंमलात आले आहे. या प्रकरणासाठी हस्तांतरण म्हणजे खरेदी अन्वये किंवा अदलाबदल खतान्वये केलेले हस्तांतरण हे होय.

आयकर अधिनियमाच्या नवीन कलम २६९ यु.एल. (१) या अन्वये ना हरकत प्रमाणपत्र दाखल झाले तरी सुध्दा अशा दस्तऐवजाचे बाबतीत कलम २३० (अ) प्रमाणे प्रमाणपत्र दाखल

झाल्याशिवाय दस्तएवेज नोंदणीचा आदेश करता येणार नाही. हे सुस्पष्ट करण्यात येत आहे. कलम २३०(अ) संबंधाच्या यापूर्वी निर्गमित केलेल्या आदेशांत कोणत्याही प्रकारचा बदल झालेला नाही.

का. प्र. मा. नोंद म.नि.
यांच्या सहीची असे.

सही /
(दि. ल. राजे)
कार्यासन अधिकारी क्र.४ व सहाय्यक
नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

शासन, राजस्व व जंगल खाते परिपत्रक क्र. १०८६/सीआर/६१८/एम.१ दि. १०.१०.८६ व त्यांचे जोडपत्रासह.

प्रत :-

१) सर्व सह जिल्हा निबंधक व सर्व दुय्यम निबंधक.
२) दुय्यम निबंधक मुंबई/ बांद्रा.
३) नोंदणी महानिरीक्षक कार्यालयातील सर्व अधिकारी.
४) शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे १